संदर्भ क्र.____________ दिनांक : २३/०५/२०१६

<u>प्रसिध्दीकरिता</u>

# 'धर्मराज्य पक्षा'च्या जनसंपर्क कार्यालयाचे पक्षाध्यक्ष राजन राजे यांच्या हस्ते उद्‌घाटन !

## लोकमान्य नगर परिसरात उत्साहाचे वातावरण

<u>ठाणे (प्रतिनिधी), दि. २३</u> : भारतातील पहिलावहिला पर्यावरणवादी पक्ष अशी ओळख असलेल्या 'धर्मराज्य पक्षा'च्या ठाणे शहरातील लोकमान्यनगर येथील जनसंपर्क कार्यालयाचे उद्‌घाटन पक्षाध्यक्ष राजन राजे यांच्या हस्ते रविवार, दि. २२ मे रोजी मोठ्या थाटामाटात आणि उत्साही वातावरणात संपन्न झाले. **"छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने राजकीय 'धंदा' करू पाहाणाऱ्या प्रस्थापित व लबाड राजकारण्यांना 'धर्मराज्य पक्ष' आता पर्याय ठरू पाहात असून, भ्रष्ट आणि जातीयवादी राजकारण करणाऱ्या राजकीय पक्षांच्या पायाखालची वाळू आता सरकण्यास सुरूवात झालेलीच आहे"** असे रोखठोक वक्तव्य **'धर्मराज्य पक्षा'**चे अध्यक्ष राजन राजे यांनी यावेळी बोलतांना केले. पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयाच्या उद्‌घाटनावेळी लोकमान्यनगर-सावरकरनगर परिसरातील स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली होती.

दरम्यान, **'धर्मराज्य पक्षा'**च्यावतीने लोकमान्यनगर आणि सावरकरनगर परिसरातील समस्यांबाबत महापालिका प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असल्याने, स्थानिक नागरिकांच्या मनात **'धर्मराज्य पक्षा'**बाबत आपुलकी निर्माण झाली असून, राजन राजे यांच्या राजकीय भूमिकेला स्थानिकांचा वैचारिक आणि मानसिक पाठिंबा मोठ्या प्रमाणात मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर **'धर्मराज्य पक्षा'**चे लोकमान्यनगर पाडा क्र. ३ चे अध्यक्ष महेश क्षिरसागर यांच्या पुढाकाराने जनसंपर्क कार्यालय सुरू करण्यात आले असून, स्थानिकांनी आपल्यावरील अन्याय किंवा प्रशासकीय गैरसोयींबद्दल **'धर्मराज्य पक्षा'**कडे दाद मागावी, असे आवाहनदेखील राजन राजे यांनी यावेळी केले. याप्रसंगी **'धर्मराज्य पक्षा'**चे उपाध्यक्ष राजू सावंत, **'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'**चे महासचिव महेशसिंग ठाकूर, ठाणे लोकसभा अध्यक्ष राजेश गडकर, सचिव विनोद मोरे, **'धर्मराज्य महिला संघटने'**च्या महाराष्ट्र राज्य समन्वयक स्वप्नाली पवार, ठाणे लोकसभा अध्यक्षा जयश्री पंडित, सचिव साक्षी शिंदे, सहसचिव दर्शना पाटील, सदस्या प्रिती क्षिरसागर, ठाणे शहर विधानसभा अध्यक्ष जगन्नाथ सलगर, लोकमान्यनगर पाडा क्र. २ चे अध्यक्ष समीर गोलतकर आदी मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी **'धर्मराज्य पक्षा'**च्या लोकमान्यनगर-सावरकरनगर परिसरातील स्थानिक कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.